# मराठी संत कवयित्री: व्यक्तित्त्व आणि कर्तृत्त्व

प्रा. अजित जयराम जाधव

आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालय (स्वायत्त) देवरुख ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी

प्राचीन मराठी संत कवींच्या कवितेप्रमाणेच मराठीत अनेक संत कवयित्रिंची कविता महत्त्वपूर्ण आहे. संतांप्रमाणेच या सर्वच स्त्रियांना कोणत्या ना कोणत्या प्रकारे जातीय भेदाभेद, अन्याय, अत्याचार, दारिद्र्य, उपेक्षा, पुरुषी जुलूमी अत्याचार इत्यादी गोष्टींना सामोरे जावे लागले. असे असूनही मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई सोयराबाई, निर्मलाबाई इत्यादी संत कवयित्रींनी मोठ्या भक्तिभावाने विठ्ठलास आळवून भक्तिमार्गाचा अवलंब केला आहे. संतांच्या कवितेइतकेच आध्यात्मिक व वाङ्मयीन क्षेत्रात संत कवयित्रिंच्या कवितेने मोलाची भर घातली आहे.

**संत मुक्ताबाई**

संत मुक्ताबाई ही निवृत्तीज्ञानदेवादी भावंडामध्ये वयाने सर्वात लहान बहीण होती. सर्व भावंडामध्ये वयाने लहान असली तरी पंढरीमाहात्म्य, नाममाहात्म्य व संतसमागम या विषयावर तिची अभंगरचना संत साहित्यात प्रसिद्ध आहे मुक्ताबाईचे 'ताटीचे अभंग' प्रसिद्ध आहेत. हे अभंग ज्ञानदेवांच्या सांत्वपर असून त्यातील अध्यात्म चिंतनीय आहे.

योगी पावन मनाचा | साही अपराध जनाचा |
विश्व रागे झाले वन्ही | संत सुखे व्हावे पाणी ||

लोकनिंदेने ज्ञानदेव व्यथित होऊन रागाने झोपडीची ताटी बंद करतात. मुकताबाई ताटी उघडा म्हणून विनवणी करतात परंतु ताटी उघडत नाही. अशावेळी ज्ञानदेवांची समजूत घालताना, उपदेश करताना जे अभंग गाईले ते अभंग महणजे ताटीचे अभंग होय. मुक्ताबाईच्या ताटीच्या अभंगातून ज्ञानदेव व मुक्ताबाई यांच्यातील आत्मियतेचा भावबंधही प्रत्ययास येतो.

'चौदावे वरुषे' शरीर जतन करून ठेवलेल्या चांगदेवांनी ज्ञानदेवांना कोरे पत्र पाठविले तेव्हा 'अजून हा कोराच' म्हणून त्यांना फटकारले आणि मुक्ताबाई त्यांची गुरुमाऊली झाल्या योगी चांगदेवाचा अहंकार मुक्ताबाईचे अलौकिक ज्ञान पाहता गळून जातो. योगमार्गाचा अनुभव सांगणारे काही कूट अभंगही तिने लिहिले आहेत.

मुंगी उडाली आकाशी | तिने गिळिले सूर्याशी |
थोर नवलाव झाला | वांझे पुत्र प्रसवला |

अशासारख्या कूटात्म अभंगात लौकिक अलौकिकाचा सुंदर मेळ दिसून येतो. मुक्ताबाई मुळातच स्पष्ट वक्त्या असल्याने त्यांचे अभंग भक्तिपेक्षा उपदेशपर अधिक आहेत.

**संत जनाबाई :** 'संत वाटिकेतील जाईची वेल' म्हणून संत जनाबाईचा उल्लेख केला जातो. संत जनाबाईचे साडे तीनशे अभंग उपलब्ध आहेत. आईवडिलांशिवाय पोरकी, अनाथ, नामदेवांच्या घरात दासी म्हणून राहणारी एक सामान्य शूद्र स्त्री अभंग लिहिते, विठ्ठलाची भक्ति करून संत पदाला पोहचली यावरून तिची आध्यात्मिक साधना स्पष्ट होते. त्याकाळचा विचार करता ही फारच क्रांतिकारक घटना होती. नामाचे महत्त्व सांगताना जनाबाई म्हणतात,

नाम विठोबाचे घ्यावे | मग पाऊल टाकावे |
नाम तारक हे थोर | नामे तारिले अपार

असे नामाचे माहात्म्य सांगीतले आहे. जनाबाई नामस्मरणाचा अखंड ध्यास घेतात. नामजपाने जीवनाचे सार्थक होते असा त्यांचा विश्वास आहे.

नाम फुकट चोरवट | नाम घेता न ये वीट |
नाश होतो आयुष्याचा | तुझे नाव न ये वाचा ||

नामजपाचे महत्त्व अधोरेखित करतानाच विठ्ठलाची अंत:करणातून भक्ती केली. पण देव भेटत नाही अशावेळी जनाबाई वैतागते विठ्ठलावर चिडते. त्याला शिव्याही देते.

अरे विठया -विठया | मूळ मायेच्या कारट्या |
तुझी रांड रंडकी झाली | जन्म सावित्री चुडाल्याली ||

जनाबाईचा विठ्ठालावरचा राग हा प्रेमरूपी राग आहे. तर कधी देवाच्या, प्रियकराच्या भेटीसाठी वेसवेप्रमाणे बेभान झालेली सामाजिक संकेताच्या पलीकडे जाऊन जनाबाई म्हणते

डोईचा पदर आला खांद्यावरी | भरल्या बाजारी जाईन मी |
जनी म्हणे मी वेसवा | निघाले केशवा तुझ्या दारी ||

इथे लाज सोडून प्रियकराच्या भेटीसाठी बेभान होणारी स्त्री दिसते. जनाबाईचे विठ्ठलाशी असणारे नाते हे केवळ परमेश्वररूपी नाही तर देव तिचा दास, सखाही झालेला आहे. देव तिच्यासाठी सर्वकाही आहे.

माझ्या डोईच्या केसास | न्हाणे नव्हते फार दिस | तेणे मुरडी केसास |
आपुल्या हाते वेणी घाली | जनी म्हणे माय आली ||

या अभंगातून जनाबाईचे एकाकीपण दिसून येते. देव तिच्यासाठी सर्वकाही आहे.
जनाबाईच्या अभंगातून अंत:करणातील भक्ती, स्त्रीमनाचा हळुवारपणा दिसून येतो.

**संत कान्होपात्रा :** कान्होपात्रा ही मुळची मंगळवेढे येथील श्यामा गणिकेची मुलगी. वेश्या व्यवसाय करणाऱ्या नायकीणीची मुलगी अत्यंत देखणी असून स्वत:विषयी, आईविषयी, समाजाविषयी अनेक प्रश्न मनात घेऊन लहानाची मोठी झाली. आईच्या पारंपरिक देहविक्रयाच्या व्यवसायाला नकार देऊन

पांडुरंगालाच आपले तनमन वाहून टाकले संवेदनशील कान्होपात्रा ऐन तारुण्यात भक्तिरसात बुडून विठ्ठलचरणी सर्वस्व अर्पण करताना म्हणते,

घ्या रे घ्या रे मुखी नाम | अंतरी धारूनिया प्रेम|
ऐसी नाममाळा | कान्होपात्रा ल्याली गळा ||

विठ्ठल भेटीविषयी तिची तळमळ अनेक अभंगातून दिसून येते. कान्होपात्रा सुंदर असल्याने तिच्या सौंदर्याच्या कीर्तीने बेदरच्या बादशाने तिला बेदरास आणण्यासाठी शिपाई पाठवल्याचे कान्होपात्रास समजले. आपल्या देहाची विटंबना होणार हे समजल्याने कान्होपात्रा आपल्या लज्जारक्षणासाठी विठ्ठलाचा धावा करून संकटातून वाचवण्यासाठी प्रार्थना करते.

नको देवराया अंत आता पाहू | प्राण हा सर्वथा फुटो पाहे |
हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियले | मजलागी जाहले तैसे देवा |

गणिकेच्या कुळात जन्म घेऊनही कान्होपात्राने आपले शरीर अपवित्र होऊ दिले नाही. कान्होपात्रेचे सकलसंत गाथेमध्ये तेवीस अभंग उपलब्ध आहेत. तिच्या अभंगात विठ्ठल महिमा, पंढरी महिमा, संत महिमा याबरोबरच मनोवस्थेचे, स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे करूणाजनक, आर्ततेचे चित्रण पाहायला मिळते. कान्होपात्रा आपल्या निस्सीम भक्तीने संत पदास पोहचली.

**सोयराबाई**

संत सोयराबाई ही संत चोखामेळा यांची पत्नी आहे. तिचे एकूण ६२ अभंग आज उपलब्ध आहेत. सोयराबाई चोखामेळ्याची पत्नी असली तरी तिच्या अभंगाची एक स्वतंत्र ओळख आहे. विठ्ठलाच्या भक्तिरसात रंगून विठ्ठलाच्या दर्शनाने स्वतःला विसरल्या आणि त्याच्याशी त्या एकरूप झाल्या. त्याविषयी त्या म्हणतात,

अवघा रंग एक झाला | रंगी रंगला श्रीरंग |
मी तू पण गेले वाया | पाहता पंढरी राया ||

सोयराबाई विठ्ठल नामस्मरणाविषयी म्हणतात

सुखाचे हे नाम आवडीने गाव | वाचे आळवावे विठोबासी |
संसार सुखाचा होईल निर्धार | नामाचा गजर सरकाळ ||

प्रामाणिकपणे विठ्ठलाचे नामस्मरण केले तर आपल्याला भवसागर तरुन जाता येईल असा त्यांचा विश्वास आहे.

सोयराबाई या जातीय विषमतेबद्दल लिहित असतानाच स्त्री म्हणून मिळणाऱ्या वागणुकीवरही तीव्र शब्दांत प्रहार करतात. विशेषतः स्त्रीच्या मासिक पाळीबद्दल तेराव्या शतकात त्यांनी व्यक्त केलेले विचार खूपच धाडसाचे म्हणावे लागतील. विटाळाबद्दल त्या लिहितात-

देहासी विटाळ म्हणती सकळ । आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध ॥
देहीचा विटाळ देहीच जन्मला । सोवळा तो झाला कवण धर्म ॥

त्यांचे हे धाडसी विचार आजही विचार करायला लावणारे आहेत. आजही मासिक पाळीबद्दल बुरसटलेल्या कल्पना घेऊन जगणाऱ्यांना सोयराबाईने दिलेली ही सणसणीत चपराकच म्हणावी लागेल. आज एकविसाव्या शतकात स्त्रियांना आत्मभान निर्माण होत असताना काही शक्ती स्त्रियांकडे केवळ मुलं जन्म घालणारे यंत्र पाहू लागतात तेव्हा संतांनी मांडलेल्या स्त्रीशक्तीच्या विचारांचा जागर होण्याची गरज अधिक अधोरेखित होते.

**संत निर्मळा**

निर्मळा ही संत चोखामेळा यांची धाकटी बहीण व संत बंका यांची पत्नी. 'सकलसंतगाथा'मध्ये त्यांचे चोवीस अभंग आढळतात. तत्कालीन समाजातील जातिभेदाचा फटका यांनाही सहन करावा लागला. परंतु विठ्ठल भक्तीच्या सहाय्याने त्यावरही मात केली. निर्मळा आपल्या भावाला म्हणजे चोखोबांना गुरु मानले. म्हणूनच आपल्या भावाच्या मार्गाने प्रपंचापेक्षा परमार्थाच्या वाटेने जाण्याचे ठरविले.

चोखा म्हणे निर्मलेसि | नाम गाये अहर्निशी |
तेने संसार सुखाचा | इह परलोक साचा ||

निर्मळेच्या साधकावस्थेतील तळमळ अभंगातून दिसून येते. संसाराच्या मोहपाशातून मुक्ती मिळावी म्हणून पांडुरंगाला साकडे घालताना म्हणते,

रात्रंदिवस मन करी तळमळ | बहू हळहळ वाटे जीवा |
बहू उबग आला संसाराचा | तोडा फासा याचा मायबापा |

संसारात कोणत्याही प्रकारचे सुख नसल्याचे सांगताना म्हणतात,

अनाथांचा नाथ कृपावंत देव | घडो तुमची सेवा अहर्निश |
पतितपावन गाजे ब्रिदावळी | पुरवावी आळी हीच माझी |

निर्मळेचा निरपेक्ष भक्तीने उद्धार झाल्याचे दिसून येते.

**संत बहिणाबाई**

बहिणाबाईचा जन्म इ. स. १६२९ मध्ये झाला. वयाच्या तिसऱ्या वर्षी तीस वर्षाच्या बिजवराशी विवाह केला. बहिणाबाईच्या लग्नाच्या कर्जामुळे वडिलांनी घरदार सोडले. त्यामुळे आई-बाप-भाऊ-नवरा यांच्यासह पायी भटकंती करावी लागली. त्यामध्ये प्रवारासंगम, शिखर शिंगणापूर, नीरा नरसिंगपूर, पंढरपूर, रहिमतपूर अशी भ्रमंती करत हे कुटुंब कोल्हापूरला स्थिरावले तेव्हा ती अकरा वर्षाची होती

कोल्हापूरच्या मुक्कामात बहिणाबाईच्या आयुष्याला नवे वळण मिळते इथेच तिच्या खऱ्या प्रपंचाची सुरुवात झाली. परंतु संसारात मन रमत नव्हते. विठ्ठलविषयीचा भक्तीभाव वाढीला लागून, कथाकीर्तनापाई नवऱ्याचा अपरिमित मार, छळ सोसावा लागला. कोल्हापूरला त्यांना जयरामस्वामींकडून तुकाराममहाराजांची कीर्ति आणि अभंगवाणी ऐकून तुकाराम भेटीची ओढ लागते वयाच्या एकोणीसाव्या वर्षी त्यांना तुकोबांचा साक्षात्कार होतो तेव्हा त्यांचे मन समाधानाने भरून येते. त्या म्हणतात,

तुकोबाचे ध्यान करूनही अंतरी | भेटता अपार सुख आहे |

बहिणी म्हणे तुका सद्गुरू सहोदर | भेटताअपार सुख आहे ||बहिणाबाई आपल्या अभंगातून गुरुचरणात लीन झालेली आहे. तुकोबांविषयीच्या भावना आपल्या अभंगात व्यक्त करतात. नाम भक्तीचा महिमा वर्णन करताना बहिणाबाई म्हणतात -

नामसंकीर्तन सर्वकाळ जया | भक्तिवंत तया म्हणो आम्ही |

क्षण एक नाही नामेविण वाचा | सोस हा भक्तीचा सर्वकाळ

भागवत संप्रदायाचा इतिहास सांगताना बहिणाबाई म्हणतात-

संतकृपा झाली | इमारत फळा आली |

ज्ञान देवे रचिला पाया | उभारिले देवालया |

आज सर्व वारकऱ्यांच्या तोंडी हा अभंग आहे. हेच बहिणाबाईचे यश आहे. आज बहिणाबाईचे चारशे अभंग उपलब्ध असून आत्मचरित्रही लिहिले आहे.

प्राचीन मराठी साहित्यात पुरुषसंतांबरोबरच स्त्रीसंतांनीही मोलाची भर घातली आहे. बुद्धिमत्तेची उंची गाठण्याचे सामर्थ्य या स्त्रियांमध्ये आहे. काही स्त्रिया या शूद्र समजल्या जातीतील असल्या तरी भक्तिमार्गात मात्र त्या संत पदापर्यंत पोहचल्या आहेत. समाजप्रबोधनातही खूप मोठा हातभार लावलेला आहे.

संदर्भ ग्रंथ -

१. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास - ल.रा. नासिराबादकर, फडके प्रकाशन, कोल्हापूर , आठवी विस्तारित आवृती, २००५
२. महाराष्ट्र संत कवयित्रि - ज. र. आजगावकर, भारत-गौरव-ग्रंथमाला, मुंबई , १९३९
३. बहुजनांतील संत कवी- कवयित्री- डॉ. फुला बागुल, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे , प्रथमावृती २०१४
४. संत कवयित्रि - इंदुमती शेवडे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई , पहिली आवृत्ती, १९८९